# नियमित फौजदारी खटला क्र.१४१/२०२३ मधील निशाणी १८ वरील आदेश
# (CNR No.MHRT030018682023)

१. अर्जदार रुपाली रविंद्र राऊत हिने सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ प्रमाणे रत्नागिरी शहर पोलिस ठाणे गुन्हा रजि.नं. २५८/२०२३ मध्ये जप्त केलेल्या सोन्याच्या चैनचा ताबा मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदारच्या कथनानुसार सदरची सोन्याची चैन ही तिचा मुलगा यश रविंद्र राऊत याच्या दैनंदिन वापरातील आहे. सदरची चैन ही अर्जदार हिने ''जी. के. नेवरेकर अलंकार'' यांच्याकडून दि.२५/०५/२०२३ रोजी खरेदी केली आहे. सदरची चैन ही अर्जदार हिच्या मालकीची आहे. सदरची चैन ही अर्जदारचा मुलगा याच्या दैनंदिन वापरातील असल्यामुळे व ती मौल्यवान असल्याने अर्जदार हिला ती तातडीने परत मिळणे आवश्यक असल्याने तिने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सरकारी वकीलांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दिले व कथन केले की, अर्जदारने मागणी केलेली सोन्याची चैन व पोलीसांनी जप्त केलेली सोन्याची चैन यांच्या वजनात फरक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

४. तपास अधिकारी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन कथन केले की, जप्त मुद्देमाल हा अर्जदारच्या मालकीचा असल्याने योग्य त्या अटी व शर्तींवर तो परत देण्यास त्यांची हरकत नाही.

५. आरोपींनी सदर अर्जावर म्हणणे देवून कथन केले की, जप्त मुद्देमाल अर्जदारला देण्यास त्यांची हरकत नाही.

६. अर्जदारने सदरच्या सोन्याच्या चैनची मुळ पावती कागदोपत्री पुरावा म्हणुन सादर केली आहे. तसेच नि.१९ येथे प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र सादर केले असून आवश्यक त्या रक्कमेच्या सुपूर्तनामा व योग्य अटी व शर्तींच्या आधारे सदरच्या मुद्देमालाचा ताबा मिळणेची विनंती केलेली आहे. पोलीसांनी जप्त केलेल्या सोन्याच्या चैनचे वजन ४.९८० ग्रॅम असे आहे, तर अर्जदारने मागणी केलेल्या सोन्याच्या चैनचे वजन ४.९६० ग्रॅम इतके आहे. जरी अशा स्वरुपाची वजनाची तफावत असली तरीही तपासीक अंमलदारांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरची चैन ही अर्जदार हिच्याच मालकीची असल्याचे म्हटले आहे. यातील आरोपींनी जप्त मुद्देमालावर आपला हक्क सांगितलेला नसून तो अर्जदार यांचे ताब्यात देण्यास आपली हरकत नसल्याचे त्याच्या म्हणण्यामध्ये कथन केले आहे.

७. सहा. सरकारी वकील श्री. झाडे यांनी जोरदार युक्तीवाद केला की, सदरची सोन्याची चैन हिच्या वजनामध्ये २० ग्रॅमचा फरक आढळून येत आहे. जप्त

केलेली सोन्याची चैन ४.९८० ग्रॅमची असून अर्जदार ४.९६० ग्रॅमची सोन्याची चैन मागत आहे. उर्वरीत २० ग्रॅम सोन्याचे पोलीसानी काय करावे असा प्रश्न उपस्थित रहातो. शिवाय, सोन्यातील वजनाच्या तफावतीमुळे अर्जदार ही सोन्याच्या चैनची मालक दिसून येत नाही. त्यांनी हा अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतलेली आहे.

८. अर्ज वाचला. त्यासोबत दाखल झालेली सोन्याच्या चैनची मुळ पावती व अर्जदारचे आधार कार्ड तपासले. संपूर्ण खटल्याचे कागदपत्र तपासले असता असे दिसते की, जप्तीच्या वेळी अर्जदारने जी माहिती पोलीसांना दिली होती त्यावरुन चोरीस गेलेल्या सोन्याच्या चैनचे वजन ४.९६० ग्रॅम होते. तेच वजन संपूर्ण पोलीस तपासातील कागदपत्रात आलेले आहे. अर्जदारने सदरच्या दागिन्याची मुळ पावती सादर केली आहे. त्यात सदरच्या दागिन्याचे वजन ४.९६० ग्रॅम दिसत आहे. सदरची वजनातील तफावत केवळ २० ग्रॅम आहे. फक्त एवढ्या कारणावरुन खटल्याच्या या टप्प्यावर अर्जदार या सोन्याच्या दागिन्याची मालक नाही असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे सहा. सरकारी वकील श्री. झाडे यांनी उपस्थित केलेल्या हरकतीत मला तथ्य आढळून येत नाही.

९. जप्त मुद्देमाल सोन्याची चैन ही विनावापर पडून राहिल्यास ती खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ती अर्जदार हिच्या ताब्यात दिल्यास त्या चैनची निगा राखणे देखील अर्जदार हिला शक्य होईल. सध्या तपास पुर्ण झाला असल्याचे

आणि सदर चैनची आवश्यकता तपासकामी नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरची चैन अर्जदार हिला काही अटी व शर्तींवर ताब्यात देणे योग्य होईल. म्हणुन खालील आदेश पारित करण्यात येतो –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गुन्हा क्रमांक २५८/२०२३ मध्ये जप्त केलेली सोन्याची चैन ही अर्जदार सौ. रुपाली रविंद्र राऊत हिच्या ताब्यात रक्कम रु.२८,०००/– (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठावीस हजार मात्र) चे हमीपत्र दिल्यानंतर देण्यात यावी.

३. अर्जदारने सदरच्या सोन्याच्या चैनमध्ये सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणताही बदल करु नये, तसेच त्रयस्थ इसमाचा हक्क किंवा अधिकार निर्माण करु नये.

४. अर्जदारने प्रकरणाच्या चौकशीसाठी सदर सोन्याच्या चैनची आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावी.

५. अर्जदारने सदर चैनचे फोटो काढून चैनचा ताबा मिळाल्यापासून सात दिवसांचे आत दाखल करणेचे आहेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2025.07.02 17:33:31 +0530

(श्रीम.एस.एस.पिंगळे)

दिनांकः– ०२/०७/२०२५ मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 02/07/2025 |
| Judgment signed by PO. on | :- | 02/07/2025 |
| Judgment uploaded on | :- | 02/07/2025 |